# वर्धा जिल्हा पोलीस शिपाई भरती सन 2024–25

दिनांक – 15/03/2026

एकूण गुण – 100
वेळ :– 1 तास 30 मिनीट

उमेदवाराचे नाव –
चेस्ट क्रमांक –
OMR उत्तरपत्रिका क्र. –

प्रश्नपत्रिका संच

**C**

## उमेदवारांसाठी सूचना

१. OMR वर चेस्ट नंबर, प्रश्नपत्रिका संच क्रमांक काळजीपुर्वक लिहावा आणि योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी. OMR उत्तरपत्रिकेवर चेस्ट नंबर आणि प्रश्नपत्रिका संच क्रमांक नसल्यास त्याचे मुल्यांकन होणार नाही आणि ते रद्द ठरविले जाऊ शकते.

२. संपूर्ण चाचणी वस्तुनिष्ठ प्रकारच्या प्रश्नांची असून त्यात १०० प्रश्न आहेत. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

३. चाचणीचा कालावधी ९० मिनीटांचा असेल.

४. प्रश्नपत्रिकेत एकुण १४ पानांमध्ये १०० बहुपर्यायी प्रश्न असल्याचे तपासुन घ्या. कोणतीही विसंगती आढळ SE पर्यवेक्षक यांना त्वरीत कळवावे.

५. संबंधीत प्रश्न क्रमांकासाठी OMR उत्तरपत्रिकेत दिलेल्या जागेत विहीत पध्दतीने उत्तर लिहीण्याची काळजी घेत OMR उत्तरपत्रिकेवर सुचनांच्या अनुसार निवडलेले पर्याय फक्त OMR उत्तरपत्रिकेवर सुचित करावेत.

६. OMR मधील वर्तुळे छायांकित करण्याकरीता फक्त काळा बॉलपॉईंट पेन वापरावा.

७. कच्चे काम OMR उत्तरपत्रिकेवर न करता प्रश्न पुस्तिकेत दिलेल्या कोऱ्या जागेतच करावे.

८. चाचणी अखेरीस उमेदवाराने OMR उत्तरपत्रिका (मुळ प्रत) पर्यवेक्षक यांना सादर करणे आवश्यक आहे.

९. परीक्षा पुर्ण झाल्यानंतर प्रश्नपत्रिका आणि OMR (उमेदवाराची प्रत) उमेदवाराला दिली जाईल.

१०. मोबाईल, कोणताही ईलेक्ट्रॉनिक अथवा मेकॅनिकल गॅझेटचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. सदर वस्तू आढळून आल्यास कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

Vision Khaki

Scanned with OKEN Scanner

1. 3 ते 28 पर्यंत किती सम संख्या आहेत ?

   अ) 13 ब) 12
   क) 16 ड) 14

2. $\frac{3}{4}+\frac{1}{6}-\frac{2}{3}=?$

   अ) $\frac{1}{4}$ ब) $\frac{3}{4}$
   क) $\frac{1}{6}$ ड) $\frac{5}{7}$

Vision Khaki

3. A व B यांच्या आजच्या वयांचे गुणोत्तर 3 : 4 असून 7 वर्षानंतर त्यांच्या वयांचे गुणोत्तर 4 : 5 होईल, तर A चे आजचे वय काढा.

   अ) 21 ब) 28
   क) 35 ड) यापैकी नाही

4. 3, 5, 7 ने भागले असता प्रत्येक वेळी 1 उरते व 4 ने भागल्यास 0 उरते, अशी लहानात लहान संख्या शोधा.

   अ) 216 ब) 136
   क) 316 ड) 436

5. एका वर्गात 20 विद्यार्थी असून, त्यांचे सरासरी वय 7 वर्षे आहे, वर्गात शिक्षक आल्यास वयाची सरासरी 2 ने वाढते, तर शिक्षकाचे वय किती ?

   अ) 39 ब) 49
   क) 50 ड) 47

6. $\sqrt{\frac{x}{169}}=\frac{54}{39}$ तर $x=$ ?

   अ) 318 ब) 324
   क) 361 ड) 525

7. एका वर्गातील 70% मुलींनी नृत्यकलेचे शिक्षण घेतले आहे, त्याच वर्गातील 40% मुलींनी गायनकलेचे शिक्षण घेतले आहे, तर त्या वर्गातील कमीतकमी किती टक्के मुलींनी नृत्यकला व गायनकला या दोन्हीचे शिक्षण घेतले आहे ?

   अ) 10 ब) 30
   क) 20 ड) यापैकी नाही

8. एक रेल्वे छत्रपती संभाजीनगर ते पुणे 40 कि.मी. प्रती तास वेगाने जाते व पुणे ते छत्रपती संभाजीनगर 60 कि.मी प्रती तास वेगाने परत येते, तर रेल्वेचा सरासरी वेग किती ?

   अ) 50 कि.मी./तास ब) 48 कि.मी./तास
   क) 40 कि.मी./तास ड) 42 कि.मी./तास

Scanned with OKEN Scanner

9. राम एक भिंत 3 तास 15 मिनिटात रंगवतो तर 40 मिनिटात किती भिंत रंगवेल ?

अ) 3/14 ब) 5/4

क) 8/39 ड) यापैकी नाही

10. एक बोटेला A पासुन B पर्यंत व परत B पासुन A पर्यंत येण्यासाठी एकूण 6 तास लागतात. जर प्रवाहाचा वेग 3 किमी/तास व बोटेचा शांत पाण्यातील वेग 8 किमी/तास असेल तर A ते B हे अंतर किती ?

अ) 20 किमी ब) $19\frac{7}{17}$ किमी

क) $16\frac{2}{3}$ किमी ड) $20\frac{5}{8}$ किमी

11. $\frac{a}{2}=\frac{b}{3}=\frac{c}{5}$ तर $\frac{a+b+c}{c}=?$

अ) 12 ब) $\frac{12}{5}$

क) 2 ड) यापैकी नाही

12. टॅक्सीचे भाडे पहिल्या एका किलोमीटरला 14 रूपये व नंतरच्या प्रत्येक किलोमीटरला 2 रूपये असल्यास, 10 किलोमीटरचे एकूण भाडे किती ?

अ) 28 ब) 40

क) 36 ड) 32

13. जर $\cot\theta=\frac{20}{21}$ तर $\operatorname{cosec}\theta=?$

अ) $\frac{29}{21}$ ब) $\frac{23}{21}$

क) $\frac{29}{29}$ ड) $\frac{30}{21}$

14. 5, 11, 17, 23, 29, ....... या संख्यामालेतील क्रमाने येणारी 60 वी संख्या कोणती ?

अ) 365 ब) 349

क) 355 ड) 359

15. A : B = 7 : 9 आणि B : C = 3 : 5 तर A : B : C = ?

अ) 7 : 9 : 5 ब) 21 : 35 : 45

क) 7 : 9 : 15 ड) यापैकी नाही

16. एका चौरसाकृती शेताची बाजू 200 मीटर आहे, तर 6.15 रू. प्रति चौ.मीटर दराने त्या शेतास सपाट करण्याचा खर्च काढा.

अ) 246000 रू. ब) 624000 रू.

क) 426000 रू. ड) यापैकी नाही

Scanned with OKEN Scanner

17. अ आणि ब ला एक काम पूर्ण करण्यास 12 दिवस, ब आणि क ला 15 दिवस तसेच अ आणि क ला जर 20 दिवस लागतात, तर एकटा अ तेच काम किती दिवसांत पूर्ण करेल ?

अ) 40 ब) 45

क) 30 ड) 60

18. यश व प्रेम यांनी अनुक्रमे रू. 15000 व रू 25000 भांडवल गुंतवून एका धंद्यात भागीदारी स्विकारली. यशला एकूण झालेल्या नफ्याच्या 10% रक्कम देखभालीसाठी मिळते. उरलेला नफा भांडवलाच्या प्रमाणात दोघांत वाटला जातो. वर्षअखेर झालेल्या रू 20000 नफ्यापैकी यशच्या नफ्याचा वाटा किती ?

अ) रू 6750 ब) रू 8750

क) रू 9250 ड) रू 7250

19. एका संख्येचे 25% हे त्या संख्येच्या 30% पेक्षा 25 ने कमी आहे, तर ती संख्या कोणती ?

अ) 500 ब) 600

क) 250 ड) 300

20. एका रकमेचे पहिल्या व दुसऱ्या वर्षाचे चक्रवाढ व्याज अनुक्रमे 20 रू व 23 रू आहे, तर व्याजाचा द.सा.द.शे. दर किती ?

अ) 12% ब) 15%

क) 18% ड) 20%

21. $6^{0.25} \times 6^{0.75} = ?$

अ) 0 ब) 1

क) 6 ड) 36

22. $\frac{21}{11}$ मी. व्यास असलेल्या एका चाकाचे 3 किमी. अंतर पार करण्यात किती फेरे होतील ?

अ) 600 ब) 500

क) 750 ड) 450

23. एका बहूभुजाकृतीला 20 कर्ण आहेत, तर त्या बहुभुजाकृतीला बाजू किती ?

अ) 9 ब) 6

क) 7 ड) 8

24. जर $\left(a^2 + \frac{1}{a^2}\right) = 27$ तर $\left(a - \frac{1}{a}\right) =$ किती ?

अ) 6 ब) 3

क) 5 ड) 4

Scanned with OKEN Scanner

25. एक विक्रेता एक कपाट 2520 रूपयास विकून 20% नफा मिळवितो, तर त्या कपाटाची खरेदीची किंमत किती ?

अ) 2200 रू.
ब) 2100 रू.
क) 2000 रू.
ड) यापैकी नाही

26. खालील अक्षर मालिका पुर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

abca_bbc_a_ _bbbcc_

अ) ababc
ब) acdef
क) acaac
ड) ababb

27. एका सांकेतिक भाषेत GOVERN हा शब्द hnwdsm असा लिहिला, तर qqpejkt म्हणजे काय ?

अ) RRQDKJU
ब) PROFILS
क) RPQCKJU
ड) PROGRESS

28. एका सांकेतिक भाषेत जर CHEMISTRY = 81, MATHEMATICS = 121, PHYSICS = 49, तर त्याच सांकेतिक भाषेत PSYCHOLOGY = ?

अ) 81
ब) 64
क) 100
ड) 121

29. खालीलपैकी विसंगत घटक कोणता ?

अ) P + N = 30
ब) D + S = 46
क) T + Q = 74
ड) A + T = 42

30. 74 : 121 : : 57 : ?

अ) 146
ब) 132
क) 114
ड) 136


31.




तर * च्या जागी कोणती संख्या येईल ?


अ) 26
ब) 36
क) 32
ड) 117

32.





अ) 23
ब) 32
क) 13
ड) 33

33. एका कंपनीच्या लेखा विभागात काही लोक असे आहेत जे फक्त सी.ए. आहेत आणि काही असे आहेत जे फक्त कॉस्ट अकौटंट आहेत. अगदी थोडे सी.ए. व कॉस्ट अकौटंट या दोन्हीची पात्रता धारण करतात. याशिवाय येथे असे काही आहेत जे मॅनेजमेंट अकौन्टन्सीची पात्रता धारण करतात. मॅनेजमेंट अकौटंट पैकी काहींनी सी.ए. किंवा कॉस्ट अकौटंटसाठीची पात्रताही धारण केली आहे. खालीलपैकी कोणती आकृती वरील सत्याचे प्रतिनिधित्व करते ?

अ) 

ब) 

क) 

ड) 

34. अमितचे वय निलेशच्या वयाच्या $\frac{1}{3}$ आहे. अपर्णाचे वय निलेशच्या वयाच्या निम्मे असून, संदीपचे वय अपर्णाच्या वयाच्या दिडपट आहे. राजेशचे वय 16 वर्षे असून तो संदीपपेक्षा 2 वर्षांनी लहान आहे, तर अमितचे वय किती ?

अ) 18 ब) 8

क) 10 ड) 6

35. श्रीकांत मैदानात उत्तरेकडे तोंड करून उभा होता. उजवीकडे वळून तो 30 किमी चालत गेला. त्यानंतर डावीकडे वळून त्याने 20 मी. अंतर कापले, पुन्हा उजवीकडे वळून तो 30 मी. चालत गेला. पुन्हा उजवीकडे वळून त्याने 45 मी. अंतर कापले व पुन्हा एकदा उजवीकडेच वळून त्याने 45 मी. अंतर कापले, तर तो आता मूळ स्थानाच्या कोणत्या दिशेस आहे ?

अ) पूर्व ब) नैर्ऋत्य

क) ईशान्य ड) आग्नेय

36. जर 'x' म्हणजे +, '÷' म्हणजे −, '−' म्हणजे ×, '+' म्हणजे ÷ तर

$9 \times 5 - 7 + 7 \div 8 = ?$

अ) 7 ब) 22

क) 9 ड) 6

37. मराठी भाषा बोलणारे काही लोक हिंदी बोलतात. हिंदी बोलणाऱ्या काहींना इंग्रजी बोलता येते. कोणाही इंग्रजी बोलणाऱ्यास मराठी भाषा येत नाही. वरील माहिती संपूर्णपणे खालीलपैकी कोणत्या आकृतीत दर्शविता येईल ?

अ) 

ब) 

क) 

ड) 

51. खालीलपैकी अनेकवचन नसणारा शब्द कोणता ?

अ) ससा ब) माळा क) सभा ड) शाळा

52. खालीलपैकी भाववाचक नाम कोणते ?

अ) हिमालय ब) पुस्तक क) नवलाई ड) लेखणी

53. खालील वाक्यातील सर्वनामाचा प्रकार ओळखा.

हा माझा वर्गबंधू आहे.

अ) दर्शक सर्वनाम ब) संबंधी सर्वनाम
क) आत्मवाचक सर्वनाम ड) पुरुषवाचक

54. 'जत्रेला पुष्कळ लोक आले होते.' या वाक्यातील विशेषणाचा प्रकार कोणता ?

अ) आवृत्तीवाचक ब) अनिश्चित
क) क्रमवाचक ड) गणनावाचक

55. 'मला दोन मैल चालवते.' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार कोणता ?

अ) प्रयोजक क्रियापद ब) संयुक्त क्रियापद
क) शक्य क्रियापद ड) अनियीमत क्रियापद

56. 'मी त्या तळ्याच्या काठी बसे.' काळ ओळखा.

अ) भूतकाळ ब) रीती भूतकाळ
क) वर्तमानकाळ ड) भविष्यकाळ

57. अरे! कुठे चाललास इकडे? या वाक्यातील केवलप्रयोगी अव्ययाचा प्रकार ओळखा.

अ) तिरस्कारदर्शक ब) संमतिदर्शक
क) आश्चर्यदर्शक ड) संबोधनदर्शक

58. बाबांनी मुलास चोपले.. या वाक्याचा प्रयोग ओळखा.

अ) अकर्मक भावे ब) सकर्मक भावे
क) सकर्मक कर्तरी ड) कर्मणी

59. खालीलपैकी गतीवाचक शब्दयोगी अव्यय कोणते ?

अ) मांजराकडून ब) पाण्यामध्ये क) बिळातून ड) वाऱ्यामुळे

60. पुढील शब्दाचा समास ओळखा : सहकुटुंब

अ) नञ तत्पुरुष ब) द्वंद्व
क) द्विगू ड) बहुव्रीही

61. 'आम्ही जातो आमुच्या गावा' या वाक्यातील उद्देश्य कोणते ?

अ) गावा ब) आम्ही क) जातो ड) आमुच्या

पुढीलपैकी <u>चंद्र</u> या शब्दाचा समानार्थी नसणारा शब्द कोणता ?

अ) कुमुदनाथ ब) सुधाकर क) शशांक ड) सलील

उपमर्द करणे म्हणजे –

अ) नष्ट करणे ब) त्याग करणे क) अपमान करणे ड) सुड उगविणे

समुहदर्शक शब्द पुर्ण करा.

**उतारुंची** .............

अ) धावपळ ब) लगबग क) संघ ड) झुंबड

5. खालील पर्यायातील अशुध्द शब्द ओळखा.

अ) दिपावली ब) आशीर्वाद क) शारीरिक ड) क्रीडा

दिपावली शारिरिक

6. खालील पैकी कोणते पर्यटन स्थळ वर्धा जिल्ह्यात येत नाही ?

अ) बापूकुटी आश्रम
ब) गिताई मंदिर
क) दीक्षाभूमी
ड) विश्वशांती स्तूप

7. महाराष्ट्रातील समृध्दी महामार्ग हा खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यातून जात नाही ?

अ) छत्रपती संभाजीनगर
ब) वाशिम
क) चंद्रपूर
ड) वर्धा

78. महाराष्ट्र राज्याचे सध्याचे राज्यपाल कोण आहेत ?

अ) आचार्य देवव्रत
ब) जिष्णू देव वर्मा
क) भगतसिंग कोश्यारी
ड) रमेश बैस

79. ICC महिला क्रिकेट वर्ल्डकप – 2025 मध्ये भारतीय संघाची कर्णधार कोण होती ?

अ) स्मृती मंधाना
ब) दिप्ती शर्मा
क) जेमिमा रॉडरिक्स
ड) हरमनप्रित कौर

80. वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर तालुक्यातील वायगाव हे गांव कशासाठी प्रसिध्द आहे ?

अ) हळद
ब) संत्री
क) आले
ड) सिताफळ

81. महाराष्ट्र पोलीस रेजिंग डे (वर्धापन दिन) कोणत्या तारखेला साजरा केला जातो ?

अ) 2 जानेवारी
ब) 2 फेब्रुवारी
क) 1 मे
ड) 3 मार्च

82. महाराष्ट्र पोलीसांचा आपत्कालीन प्रतिसाद नंबर कोणता आहे ?

अ) 102
ब) 108
क) 112
ड) 101




Scanned with OKEN Scanner

44. खेळाडू, 18 वर्षांवरील खेळाडू, 18 वर्षांखालील खेळाडू, विविध कारणांमुळे सध्या खेळत नसलेले खेळाडू हे खालीलपैकी कोणत्या व्हेन आकृतीने दाखविता येईल ?

अ)



ब)



क)



ड)



45. (I)




(II)




यात a विरूध्द अक्षर कोणते ?

अ) f

ब) e

क) c

ड) b

46. सव्वा तीन वाजता तास काटा व मिनीट काटा यांच्यामध्ये किती अंशाचा कोन तयार होईल ?

अ) $6^0$

ब) $9.5^0$

क) $7.5^0$

ड) $8^0$

47. मुलांच्या रांगेत रहिम अगदी मधोमध उभा असून त्याचा दोन्ही बाजूकडून क्रमांक 17 वा आहे तर याच रांगेतील सलीम डावीकडून 9 वा असेल तर त्याचा उजवीकडून क्रमांक कितवा ?

अ) 25

ब) 24

क) 23

ड) 26

48. रविनाचा जन्म सोमवारी 5 एप्रिल 1991 ला झाला तर तिचा 12 वा वाढदिवस कोणत्या वारी येईल ?

अ) सोमवार

ब) मंगळवार

क) बुधवार

ड) रविवार

49. एका परिवारात विशाल हा विजयपेक्षा लहान आहे. विजया ही सोनालीपेक्षा मोठी आहे. विशाल हा सोनालीपेक्षा मोठा आहे. विजया विशालपेक्षा लहान आहे तर सर्वात मोठे कोण ?

अ) विशाल

ब) विजय

क) विजया


ड) सोनाली

50. B शहर हे A शहराच्या ईशान्येला 5 मैलावर आहे आणि C शहर हे A शहराच्या वायव्येला 12 मैलावर आहे C शहर B शहरापासून किती अंतरावर असेल ?

अ) 17 मैल

ब) 20 मैल

38. शेजारच्या आकृतीत किती त्रिकोण आहेत ?



Vision Khaki

अ) 10  ब) 11

क) 12  ड) 13

39. एका रस्त्यावरून काही घोडे व तेवढेच घोडेस्वारही चालत निघालेले आहेत. काही अंतर कापल्यानंतर त्यापैकी निम्मे घोडेस्वार घोड्यावर स्वार झाले. आता चालणाऱ्या पायांची संख्या 50 झाली, तर एकूण घोडे किती ?

अ) 20  ब) 5

क) 10  ड) 30

40. एका क्रिकेट स्पर्धेसाठी वेगवेगळे संघ आलेले आहेत. प्रत्येक संघाने दुसऱ्या प्रत्येक संघाशी सामना खेळावयाचा आहे, एकुण १५३ सामने झाले असतील तर स्पर्धेसाठी आलेल्या संघांची संख्या किती ?

अ) 15  ब) 18

क) 20  ड) 12

41. 2026 मध्ये स्वातंत्र्य दिन शनिवारी येत असेल तर त्याच वर्षी ख्रिसमस नाताळ कोणत्या वारी येईल ?

अ) शनिवार  ब) गुरूवार


क) रविवार  ड) शुक्रवार

42. सायंकाळी 06.00 ते रात्री 12.05 या काळात मिनीट काटा तास काट्याला किती वेळा ओलांडेल.

अ) 5  ब) 6

क) 7  ड) 8

43.




अ) 520  ब) 115

क) 160  ड) 450

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 62. | खालीलपैकी 'प्रेस' या टोपणनावाने प्रसिध्द असणारे कवी कोण ?<br>अ) माणिक शंकर गोडघाटे<br>ब) काशिनाथ हरि मोडक<br>क) शंकर काशिनाथ गर्गे<br>ड) त्र्यंबक बापूजी ठोंबरे |
| 63. | 'नकटे व्हावे; पण धाकटे होऊ नये' या म्हणीचा योग्य अर्थ असलेला पर्याय ओळखा.<br>अ) आपण कसे आहोत ते आरशात पाहुन चांगले दिसण्याचा प्रयत्न करावा.<br>ब) शारीरिक व्यंगापेक्षा कनिष्ठ असण्याची स्थिती फार क्लेशकारक असते.<br>क) नकट्या आणि धाकट्या माणसाची अनेकजण हेटाळणी करतात.<br>ड) नकटे आणि धाकटे नसणाऱ्याला जगात मान मिळतो. |
| 64. | 'खाई त्याला खवखवे' या म्हणीच्या विरुध्दार्थी म्हण ओळखा.<br>अ) चोराच्या मनात चांदणे. ब) गर्वाचे घर खाली.<br>क) ज्याच्या हाती ससा तो पारधी. ड) कर नाही त्याला डर नाही. |
| 65. | 'जिवाचे रान करणे' समानार्थी वाक्प्रचार सांगा.<br>अ) हाडाची काडे करणे. ब) हाड झिजवणे.<br>क) हाड मोडून पडणे. ड) हाडाचे पाणी करणे. |
| 66. | 'तत्परता' या शब्दाच्या विरुध्दार्थी शब्द ओळखा.<br>अ) लगबग ब) कुचराई क) ताबडतोब ड) तातुरता |
| 67. | आमची शाळा – अधोरेखीत विशेषणाचा प्रकार कोणता?<br>अ) आवृत्तीदर्शक ब) नामसाधित विशेषण<br>क) सर्वनामसाधित विशेषण ड) गुणविशेषण |
| 68. | खालील विसर्गसंधी नसणारा जोडशब्द कोणता ?<br>अ) तपोबल ब) लंकेश्वर<br>क) तेजोनिधी ड) आयुर्वेद |
| 69. | खालीलपैकी कानडी परिभाषेतून न आलेला शब्द कोणता ?<br>अ) पेटी ब) हंडा क) खिसा ड) चरखा |
| 70. | जो केव्हा ना केव्हा तरी मृत्यू पावणार असतात, त्यांना काय म्हणतात ?<br>अ) अमर ब) मर्त्य क) अजरामर ड) अनंत |
| 71. | राजमार्ग चा विरुध्दार्थी शब्द कोणता ?<br>अ) आडमार्ग ब) महामार्ग क) राष्ट्रीय मार्ग ड) अराज मार्ग |

Vision Khaki

Scanned with OKEN Scanner

83. 2026 मध्ये पद्मविभूषण पुरस्कार खालीलपैकी कोणाला मिळाला होता ?

अ) रोहीत शर्मा  ब) धर्मेंद्रसिंह देओल

क) अलका याज्ञिक  ड) उदय कोटक

84. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याची सिमा ही वर्धा जिल्ह्याला लागून नाही ?

अ) यवतमाळ  ब) अमरावती

क) भंडारा  ड) चंद्रपूर

85. भारत सरकारद्वारे नक्षलवाद संपविण्यासाठी कोणत्या तारखेचे लक्ष ठेवलेले आहे ?

अ) 31 मार्च 2026  ब) 31 एप्रिल 2026

क) 31 मार्च 2027  ड) 31 एप्रिल 2027

86. LPG व CNG हे गंधहिन वायू असल्याने त्यांची गळती शोधण्यासाठी त्यांचेमध्ये खालीलपैकी कोणता पदार्थ मिसळला जातो ?

अ) इथाइल मरकॅप्टन  ब) प्रोपाइल मरकॅप्टन

क) मिथाइल मरकॅप्टन  ड) ब्युटील मरकॅप्टन

87. केंद्र सरकारकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केव्हा प्रदान करण्यात आला ?

अ) 26 फेब्रुवारी 2025  ब) 3 ऑक्टोबर 2024

क) 4 डिसेंबर 2024  ड) 1 जानेवारी 2025

88. भारतामध्ये नवीन फौजदारी कायदे केव्हापासून लागू झाले ?

अ) 1 जानेवारी 2025  ब) 1 जुलै 2024

क) 1 मे 2025  ड) 1 ऑक्टोबर 2024

89. यक्षगान (Yakshagana) ही कोणत्या राज्याची लोकप्रिय पारंपरीक नृत्यकला आहे ?

अ) केरळ  ब) तामिळनाडू

क) कर्नाटक  ड) आंध्रप्रदेश

90. वर्धा जिल्ह्यात एकूण किती तालूके आहेत ?

अ) 6  ब) 7

क) 8  ड) 9

91. २०२५ सालची नोबल शांती पुरस्कार विजेती मारीया कोरीना माचादो ही कोणत्या देशाची निवासी आहे ?

अ) मेक्सिको  ब) व्हेनेझुएला

क) अर्जेंटिना  ड) ब्राझील

92. "जीम कॉर्बेट" हे राष्ट्रीय उद्यान खालीलपैकी कोणत्या राज्यात आहे ?

अ) छत्तीसगड  ब) आंध्रप्रदेश

क) उत्तराखंड  ड) उत्तरप्रदेश

93. HbA1C ही चाचणी खालीलपैकी कोणत्या आजारासाठी केली जाते ?

अ) हृदयविकार  ब) स्वादूपिंड विकार

क) मधुमेह  ड) न्युमोनिया

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| 94. | खालील पैकी कोणती नदी वर्धा जिल्ह्यातून जात नाही ?<br>अ) पोथरा ब) धाम<br>क) यशोदा ड) वैनगंगा |
| 95. | खालीलपैकी देश आणि त्यांची गुप्तचर यंत्रणा यांची बरोबर जोडी कोणती ?<br>अ) चीन – BND<br>ब) इस्त्राइल – MOSSAD<br>क) ब्रिटन – CIA<br>ड) रशिया – MI6 |
| 96. | कोणार्क सूर्यमंदीर कोणत्या राज्यात आहे ?<br>अ) उत्तरप्रदेश ब) मध्यप्रदेश<br>क) आसाम ड) ओडिशा |
| 97. | जागतिक वसुंधरा दिन (World Earth Day) कधी साजरा केला जातो ?<br>अ) 22 एप्रिल ब) 21 मार्च<br>क) 21 जून ड) 22 ऑक्टोबर |
| 98. | खालीलपैकी कोणता मुलभूत अधिकार नाही ?<br>अ) सांस्कृतीक व शैक्षणिक हक्क ब) शोषणाविरूध्दचा अधिकार<br>क) संपत्तीचा अधिकार ड) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार |
| 99. | छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची शपथ कोणत्या साली घेतली ?<br>अ) 1648 ब) 1645<br>क) 1642 ड) 1647 |
| 100. | खालीलपैकी कोणता व्याघ्र प्रकल्प वर्धा जिल्ह्यात आहे ?<br>अ) ताडोबा अंधारी ब) बोर<br>क) मेळघाट ड) पेंच |

Vision Khaki

Scanned with OKEN Scanner